पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ०२

**सभावृत्तांत**

दिनांक - **०७/१२/२०२१** वेळ - दुपारी **२.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची **पाक्षिक** सभा मंगळवार दिनांक **०७/१२/२०२१** रोजी **दु.२.३० वा.** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात मा. उप सचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.२२ ऑक्टोबर २०२१ अन्वये आयोजित करणेत आलेली आहे. सदर सभेत खालीलप्रमाणे सन्मा.सदस्य सभागृहात उपस्थित होते.

**१. मा. अनुराधा गणपत गोरखे - सभापती**
२. मा. बाळासाहेब नामदेव ओव्हाळ
३. मा. प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे
४. मा. साधना अंकुश मळेकर
५. मा. चोंधे आरती सुरेश
६. मा. वैशाली ज्ञानदेव घोडेकर

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.आण्णा बोदडे - सहाय्यक आयुक्त, मा.शिरिष पोरेडी - कार्यकारी अभियंता, मा.रामगुडे - कार्यकारी अभियंता, मा.महाजन - कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) तृतीय पंथीयांसाठी स्मार्ट स्वच्छतागृह बांधणेबाबत.
मा.प्रा.सोनाली गव्हाणे व मा.आरती चोंधे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) सॅनिटरी नॅपकिन व्हेंडिंग मशीन व डिस्पोजेबल मशीन बसविणेबाबत.
मा.साधना मळेकर व मा.आरती चोंधे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) “**बाथ हब** ” (मुतारी, स्वच्छता गृहे आंघोळीची सोय) सुरु करणेबाबत.
मा.प्रा.सोनाली गव्हाणे व मा.साधना मळेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) पिं.चिं.मनपा कार्यालयांमध्ये पाळणाघर चालु करणेबाबत.
मा.साधना मळेकर व मा.प्रा.सोनाली गव्हाणे यांचा प्रस्ताव.

----------

अ) दिनांक २०/१०/२०२१ रोजी झालेल्या सभेचा ( **कार्यपत्रिका क्रमांक २०** ) चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

आ) दिनांक १८/११/२०२१ रोजी झालेल्या (**विशेष सभेचा)** ( **कार्यपत्रिका क्रमांक ०१** ) चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - २ विषय क्रमांक - १

दिनांक - ०७/१२/२०२१

सुचक - मा.प्रा.सोनाली गव्हाणे अनुमोदक - मा.आरती चोंधे

संदर्भ - मा.प्रा.सोनाली गव्हाणे व मा.आरती चोंधे यांचा प्रस्ताव.

स्मार्ट सिटीच्या अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे तृतीयपंथांसाठी स्वतंत्ररित्या शहराच्या रहदारीच्या भागात चौकात आणि महत्वाच्या ठिकाणी स्वच्छतागृहे उभारणे ही काळाची गरज आहे. याठिकाणी पाण्याची व्यवस्था, सुरक्षेच्या दृष्टीने त्याठिकाणी सी.सी.टी.व्ही कॅमेरे देखील असणे आवश्यक आहे. या सर्व बाबींचा विचार करुन अधुनिक पद्धतीने स्वच्छतागृहे उभारण्यात यावे. तसेच दिव्यांगांसाठी रॅम्प सहित व सी.सी.टी.व्ही. कॅमेरे, पाण्याची व्यवस्था, महत्वाची जागा, रेल्वे स्टेशन भाजी मार्केट, पिंपरी डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा, भक्ती शक्ती शिल्प जेणे करुन महिला पालकांची खुप गैरसोय होते. तसेच निगडी बसस्टॉप, आण्णासाहेब स्मारक जवळ स्वच्छतागृहे रॅम्प सहित अंपंगासाठी उभारणे गरजेचे आहे. तरी या सर्व बाबींचा विचार करुन स्मार्ट स्वच्छतागृहे उभारण्यास येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३ विषय क्रमांक - २

दिनांक - ०७/१२/२०२१

सुचक - मा.साधना मळेकर अनुमोदक - मा.आरती चोंधे

संदर्भ - मा.साधना मळेकर व मा.आरती चोंधे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत महिला कर्माचारी यांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने मासिक पाळी दरम्यान वापरल्या जाणारे सॅनिटरी नॅपकीन चे प्रमाण वाढविण्यासाठी तसेच वापरल्या जाणा-या सॅनटरी पॅडचे विघटन होण्यासाठी डिस्पोजेबल मशीन असणे आवश्यक आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत कार्यरत असणा-या महिलांकरिता महापालिकेच्या संपुर्ण कार्यालयात सॅनिटरी नॅपकिन व्हेंडिंग मशीन व डिस्पोजेबल

मशीन बसविण्यास व याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४ विषय क्रमांक - ३

दिनांक - ०७/१२/२०२१

सुचक - मा.प्रा.सोनाली गव्हाणे अनुमोदक - मा.साधना मळेकर

संदर्भ - मा.प्रा.सोनाली गव्हाणे व मा.साधना मळेकर यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड शहरात मोठ्या प्रमाणावर शहरा बाहेरिल लोक काही ना काही कामाकरिता येत असतात. किंवा आपल्या शहरातून बाहेरील भागात जात येत असतात. परंतु शहरातून जात-येत असताना त्यांच्या सोयीकरिता मुतारी, स्वच्छता गृहे, अंघोळीची सोय नाही त्यामुळे प्रवासा दरम्यान बाहेरुन येणा-या लोकांना स्वत:ची स्वच्छता ठेवता येत नाही. तसेच काही कुटुंबातील महिलांची गैरसोय मोठ्या प्रमाणावर होत असते. त्यांना स्वत:ची स्वच्छता राखता यावी याकरिता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत **"बाथ हब"** सुरु करणे अती गरजेचे आहे, जेणे करुन बाहेरुन येणा-या लोकांना स्वत:ची स्वच्छता करणेस सोयीचे होईल. त्यामुळे **"बाथ हब"** हे भक्ती-शक्ती चौक, निगडी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, पिंपरी या ठिकाणी **"बाथ हब"** ची व्यवस्था करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५ विषय क्रमांक - ४

दिनांक - ०७/१२/२०२१

सुचक - मा.साधना मळेकर अनुमोदक - मा.प्रा.सोनाली गव्हाणे

संदर्भ - मा.साधना मळेकर व मा.प्रा.सोनाली गव्हाणे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये महिला वर्गाची संख्या जास्त प्रमाणात असुन काही महिलांना त्यांच्या लहान शिशुंना स्तनपान करता येत नाही. पाळणाघरात ठेवतात त्यामुळे त्यांना लहान शिशुंना स्तनपान करणे शक्य होत नाही. तरी अशा महिला कर्मचारी यांचे बालकांसाठी मनपा कार्यालयामध्ये स्तनदा मातांच्या सोईचे दृष्टीने पाळणाघर सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **अनुराधा गणपत गोरखे** )
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/०४/कावि/५५२/२०२१
दिनांक : ०७/१२/२०२१



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.